# प्रेस नोट ता. १५/०६/२०२३ पोलीस स्टेशन - वाकड

## मोटार सायकल चोरी करणारे ०२ चोरटयांना अटक आरोपींकडुन चोरीचे एकुण २२ गुन्हे उघड करुन किं.रु. १५,४०,०००/- च्या २२ मोटार सायकली जप्त.

## वाकड पोलीस स्टेशन तपास पथकाची कामगिरी.

--- ०० ---

पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयाचे कार्यक्षेत्रात मोटार सायकल चोरी मध्ये मोठया प्रमाणात वाढ झालेने **मा. श्री. विनयकुमार चौबे सो, पोलीस आयुक्त,पिंपरी चिंचवड,** यांनी सर्व पोलीस स्टेशनचे प्रभारी अधिकारी यांना जास्तीत जास्त पोलीस अंमलदार नेमुन सतर्क पेट्रोलींग, सक्त नाकाबंदी, वाहन चोरी करणारे आरोपींची माहीती काढुन आरोपी अटक करुन वाहन चोरींना आळा घालणेबाबत आदेश दिले आहेत.

मा.श्री. गणेश जवादवाड,वरिष्ठ पोलीस निरीक्षक वाकड पोलीस ठाणे यांनी त्यांचे अधिनस्थ असलेल्या तपास पथकाकील सपोनि संतोष पाटील, पोउपनि.सचिन चव्हाण यांना सोबतचे पोलीस अंमलदार यांचा वापर करुन वाहन चोरीचे रेकॉर्डवरील गुन्हेगार चेक करणे, वारंवार वाहन चोरीचे ठिकाणी सापळा रचने तसेच महत्वाचे येण्या जाण्याचे मार्गावर अचानक नाकाबंदी करुन वाहने चेक करुन मोटार सायकल चोरींना आळा घालने तसेच दाखल गुन्हयातील आरोपी निष्पन्न करुन आरोपींना अटक करणेबाबत सुचना दिल्या.

त्याप्रमाणे तपास पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी मोटार सायकल चोरांची माहिती प्राप्त करण्यासाठी तांत्रिक तपास व पांरपारिक गोपनिय बातमीद्वारे माहिती प्राप्त करून तपास सुरू केला. त्याकरिता अनेक सीसीटीव्ही फुटेजची पाहणी करण्यात आली तसेच दिवसा व रात्री अचानक नाकाबंदी कारवाई करुन मोटार सायकली तपासणी केली. तपासादरम्यान माहीती मिळाली की, चोरीची मोटार सायकली विक्री करीता दोन चोरटे ताथवडे परिसरात येणार आहेत. अशी बातमी मिळालेने सपोनि. संतोष पाटील, पोउपनि.सचिन चव्हाण स्टाफसह प्राप्त माहिती अनुषंगाने ताथवडे येथे रवाना झाले. काही वेळात सदर ठिकाणी प्राप्त माहितीचे वर्णनाचे दोन इसम दोन मोटार सायकलीवरुन तेथे आले. पोलीसांची चाहुल लागताच आरोपीं सदर ठिकाणांवरुन पळुन जाण्याचा प्रयत्न करित असतांना श्री. संतोष पाटील, पोउपनि.सचिन चव्हाण यांनी सोबतच्या स्टाफसह शिताफिने त्यांना ताब्यात घेवुन नाव पत्ता विचारले असता त्यांनी आपली नावे **१) ओंकार दिलीप गवारे वय २३ वर्षे रा. हनुमान मंदीरासमोर, साई निवास बिल्डींग, पिंपळे सौदागर पोलीस चौकीचे मागे, पिंपळे सौदागर पुणे २) महेश महादेव दनाने वय २१ वर्षे रा. माळी आळी, स्मशानभुमीजवळ, सौंदर्य कॉलनी, अनिकेत वाघेरे यांचे खोलीत, पिंपरी पुणे** असे सांगितले. त्यांचे ताब्यातील युनिकॉर्न व स्प्लेण्डर मोटार सायकल बाबत त्यांचेकडे तपास केला असता त्यांनी सदरच्या मोटार सायकली वाकड परीसरातुन चोरलेचे सांगीतलेने सदरचे दोन मोटार सायकली जप्त करणेत आल्या. दोन्ही आरोपी अटक करुन आरोंपीकडे कौशल्यपुर्वक तपास केला असता त्यांनी त्यांचा साथीदार विधीसंघर्षीत बालक याचे सोबत पिंपरी चिंचवड, पुणे जिल्हा परीसरातील मोटार सायकल चोरीचे एकुण २२ गुन्हयांची कबुली देवुन किं.रु. १५,४०,०००/- रुपये किंमतीच्या २२ मोटार सायकली त्यांचेकडुन जप्त करणेत आल्या असुन अधिक तपास करीत आहोत.आरोपींची दि.१९/०६/२०२३ रोजी पर्यत पोलीस कोठडी प्राप्त आहे.

**गुन्हयाचे तपासात आरोपी व विधीसंघर्षीत बालक यांनी चोरलेल्या मोटार सायकली त्यांचे नातेवाईकांना विकल्याचे निष्पन्न झालेने गुन्हयात चोरीचे वाहन विकत घेणारे तीन इसमांना आरोपी करणेत आलेले आहे. नागरीकांना याद्वारे आवाहन करणेत येत आहे की, कोणीही व्यक्ती आपणास स्वस्त दरामध्ये विना कागदपत्रांची मोटार सायकली विक्री करीत असेल तर सदरचे मोटार सायकली विकत न घेता सदरचे व्यक्तीची माहीती तात्काळ जवळचे पोलीस स्टेशनला दयावी.जर आपण चोरीचे वाहन विकत घेतले तर आपण चोरीची मालमत्ता विकत घेतली यासदराखाली आरोपी होवु शकता.**

**आरोपींकडुन खालील गुन्हे उघड करणेत आले आहेत -**

| अ.क्र. | पोलीस ठाणे | गु.र.नंबर | कलम |
|---|---|---|---|
| १ | वाकड | ५५०/२०२३ | भा.द.वि.कलम ३७९ प्रमाणे |
| २ | वाकड | ५५१/२०२३ | भा.द.वि.कलम ३७९प्रमाणे |
| ३ | वाकड | ४६९/२०२३ | भा.द.वि.कलम ३७९ प्रमाणे |
| ४ | वाकड | ५५३/२०२३ | भा.द.वि.कलम ३७९ प्रमाणे |
| ५ | वाकड | ५३०/२०२३ | भा.द.वि.कलम ३७९ प्रमाणे |
| ६ | वाकड | ५२८/२०२३ | भा.द.वि.कलम ३७९ प्रमाणे |
| ७ | वाकड | ५२०/२०२३ | भा.द.वि.कलम ३७९ प्रमाणे |
| ८ | वाकड | ४९५/२०२३ | भा.द.वि.कलम ३७९ प्रमाणे |
| ९ | वाकड | ५५२/२०२३ | भा.द.वि.कलम ३७९ प्रमाणे |
| १० | वाकड | ५६१/२०२३ | भा.द.वि.कलम ३७९ प्रमाणे |
| ११ | वाकड | ५६४/२०२३ | भा.द.वि.कलम ३७९ प्रमाणे |
| १२ | वाकड | ७२८/२०२२ | भा.द.वि.कलम ३७९ प्रमाणे |
| १३ | वाकड | ५२७/२०२३ | भा.द.वि.कलम ३७९ प्रमाणे |
| १४ | पिंपरी | ६२४/२०२३ | भा.द.वि.कलम ३७९ प्रमाणे |
| १५ | पिंपरी | ११३४/२०२२ | भा.द.वि.कलम ३७९ प्रमाणे |
| १६ | हिंजवडी | ६७०/२०२३ | भा.द.वि.कलम ३७९ प्रमाणे |
| १७ | सांगवी | ७४/२०२३ | भा.द.वि.कलम ३७९ प्रमाणे |
| १८ | सांगवी | २४६/२०२३ | भा.द.वि.कलम ३७९ प्रमाणे |
| १९ | सांगवी | ०५/२०२३ | भा.द.वि.कलम ३७९ प्रमाणे |
| २० | रावेत | २२१/२०२३ | भा.द.वि.कलम ३७९ प्रमाणे |
| २१ | रावेत | २३१/२०२३ | भा.द.वि.कलम ३७९ प्रमाणे |
| २२ | दौंड | ४९२/२०२३ | भा.द.वि.कलम ३७९ प्रमाणे |

सदरची कारवाई मा. श्री. विनयकुमार चौबे सो, पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड, मा. डॉ.संजय शिंदे सो, सह पोलीस आयुक्त, मा.श्री.वसंत परदेशी सो,अपर पोलीस आयुक्त पिंपरी चिंचवड, मा. श्री. डॉ.काकासाहेब डोळे सो, पोलीस उप आयुक्त,परि २, पिंपरी चिंचवड, मा. श्री. विशाल हिरे सो, सहा.पोलीस आयुक्त ,वाकड विभाग, पिंपरी चिंचवड यांचे मार्गदर्शनाखाली मा.श्री. गणेश जवादवाड, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, मा.श्री.रामचंद्र घाडगे पोलीस निरीक्षक (गुन्हे), सपोनि. संतोष पाटील, पोउपनि.सचिन चव्हाण, सपोफौ.बिभीषण कन्हेरकर, सपोफौ.बाबाजान इनामदार, सपोफौ.राजेंद्र काळे, पोहवा.वंदु गिरे, पोहवा.संदीप गवारी, पोहवा.दिपक साबळे, पोहवा.स्वप्निल खेतले, पोहवा.अतिश जाधव, पोहवा.प्रमोद कदम, पोहवा संतोष बर्गे, पोना.प्रशांत गिलबीले, पोना.अतिक शेख, पोना.विक्रांत चव्हाण, पोना.राम तळपे, पोशि.अजय फल्ले, पोशि.तात्या शिंदे, पोशि.कौतेंय खराडे, पोशि.भास्कर भारती, पोशि.स्वप्निल लोखंडे, पोशि.सौदागर लामतुरे, पोशि.विनायक घारगे, पोशि रमेश खेडकर, पोशि.सागर पंडीत (परि-०२ कार्यालय) यांनी मिळुन केली आहे.

**(डॉ.काकासाहेब डोळे)**
पोलीस उप आयुक्त,
परिमंडळ-२, पिंपरी चिंचवड